# प्रेस नोट दि. २४/०९/२०२१

## येरवडा मध्यवर्ती कारागृहातुन नजरचुकीने मुक्त झालेल्या व नंतर फरार असलेल्या आरोपीस गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन त्याचे ०३ साथिदारांसह अटक, घरफोडीचा १ व वाहनचोरीचे ०२ गुन्हे उघड, एकुण ०१,३८,०००/- रु किं चा मुद्देमाल जप्त

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाचे हद्दीत वाढत्या घरफोडी व वाहनचोरीच्या गुन्ह्यांचे अनुषंगाने घडलेले गुन्हे उघडकीस आणुन गुन्ह्यांना प्रतिबंध घालणेबाबत **मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. कृष्ण प्रकाश सो**, यांनी गुन्हे शाखेस आदेशित केलेले आहे.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. प्रशांत अमृतकर, गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर तसेच गुन्हे शाखा युनिट-४ कडील स्टाफ घडलेल्या घरफोडी व वाहनचोरीच्या गुन्हया बाबत तपास करत असतांना **सहायक पोलीस उपनिरीक्षक नारायण जाधव**, व **पो.शि. २२९७/ तुषार काळे** यांना मिळालेल्या बातमी वरुन दि. २३/०९/२०२१ रोजी साने चौक,चिखली परिसरातुन आरोपी नामे १) **अजय रमेश भालेराव,वय-२५ वर्षे, रा- लालटोपी नगर, मोरवाडी, पिंपरी, पुणे** २) **अभिषेक ऊर्फ पांडु अरुण जगधने, वय-२२ वर्षे, रा- साईबाबा मंदीर जवळ, शांतीनगर, कळवा रेल्वे स्टेशन बाजुला, कळवा (इस्ट), ठाणे** ३) **संतोष ऊर्फ बबलु मधुकर धनसरे वय २३ वर्षे रा. गायकवाड गल्ली, उमरदरी, ता. मुखेड जि. नांदेड** ४) **संजय अजित तिरके वय २४ वर्षे रा. कामठेवस्ती, लोहिया नगर, हडपसर, पुणे** यांना सापळा रचुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे कसोशीने तपास केला असता त्यांनी चिखली पोलिस स्टेशन चे अभिलेखावरिल घरफोडीचा १ व वाहनचोरीचा १ तसेच पिंपरी पोलिस स्टेशन चे अभिलेखावरिल वाहनचोरीचा १ असे एकुण ०३ गुन्हे केल्याचे निष्पण्ण करुन त्यांचेकडुन ४३,०००/- कि.चे सोन्या चांदीचे दागिणे व ९५,०००/- रु कि. च्या दोन मोटारसायकल असा एकुण ०१,३८,०००/- रु कि. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींकडुन खालिलप्रमाणे गुन्हे उघड झाले आहेत.

१) चिखली पोलिस स्टेशन गु.र.क्र. ४७०/२०२१ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८०
२) चिखली पोलिस स्टेशन गु.र.क्र. ४१४/२०२१ भा.द.वि. कलम ३७९
३) पिंपरी पोलिस स्टेशन गु.र.क्र. ६१०/२०२१ भा.द.वि. कलम ३७९

तसेच आरापी नामे **संतोष ऊर्फ बबलु मधुकर धनसरे वय २३ वर्षे रा. गायकवाड गल्ली, उमरदरी, ता. मुखेड जि. नांदेड** हा येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे एका वाहनचोरीचे गुन्ह्यात शिक्षा भोगत असतांना त्याचेवर आणखी ०३ वाहनचोरीचे गुन्ह्यांसदर्भात खटले सुरु होते. परंतु पहिल्या गुन्ह्यात त्याची शिक्षा पुर्ण झालेवर त्यास दि. १२/०१/२०२१ रोजी संबंधित कारकुनाचे नजरचुकीने मुक्त करण्यात आले होते व तो तेव्हापासुन फरार होता.

सदर आरोपींना पुढील कारवाई कामी चिखली पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आहे.

---ooo---

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे मा. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक, सिद्धनाथ बाबर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, तुषार शेटे, पोना/मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, तुषार काळे, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, आदिनाथ ओंबासे सुखदेव गावंडे, यांनी केली आहे.**

Shiremath

**(सुधीर हिरेमठ) भा.पो.से**
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय
पिंपरी चिंचवड